मराठवाडा - 29-2-७३
औरंगाबाद.

# ही कला-प्रदर्शने कशासाठी?

मराठवाडा विभागाच्या परिसरात भारतीय संस्कृतीच्या संपन्नतेच्या खुणा जागोजागी आढळून येतात. आंतरराष्ट्रीय कीर्तीची वेरूळची लेणी, अजिठ्यातील भित्तिचित्रे ही या विभागाचीच नव्हे तर सबंध भारताची भूषणे आहेत. पारंपारिक कलेची इतकी अभिरुचीपूर्ण, सौंदर्यदृष्टया अप्रतिम अशी ही उदाहरणे या विभागात असतानासुद्धा या विभागात कलेचे शास्त्रोक्त पद्धतीन शिक्षण देणाऱ्या संस्था केवळ बोटांवर मोजण्याइतक्याच व त्याही श्री वसेकर गुरुजींसारख्या एखाद-दुसऱ्या व्यक्तीच्या प्रयत्नांतून निर्माण झाल्या परंतु कलेच्या उच्च शिक्षणातील समस्या अशा खाजगी कलासंस्थांतून सहजासहजी सुटू शकत नाहीत. त्याला लागणारे मनुष्यबळ, पैसा, जागा ह्या सर्व गोष्टी लक्षात घेता अशा व्यक्तींचे श्रम, प्रयत्न व कष्ट फलप्राप्तीस कमीच पडतात. अशा व्यक्तींनी जरी प्रयत्न केले व आपले कार्य अविरतपणे चालू ठेवले तरी या विभागात, कलाशिक्षणाकडे पाहण्याचा सामान्य माणसांचा दृष्टिकोन, माध्यमिक शिक्षणक्रमातील कलाअभ्यासातील उणीवा, समाजातील आर्थिक परिस्थिती या ना त्या कारणाने उच्चकला शिक्षणाबाबत अनास्थाच निर्माण झाली. या भागातील होतकरू कलावंतांतील कलेची बीजे मूळ धरू शकली नाहीत. जे काही थोडेफार कलागुणसंपन्न विद्यार्थी परिस्थितीने बरे होते त्यांनी आपल्या कला-गुणांची वाढ मुंबईसारख्या ठिकाणी शिक्षण घेऊन पूर्णत्वास नेली व त्यात लौकिकही मिळविला. पण सुयोग्य उच्चकला शिक्षण संस्थेअभावी बऱ्याच गुणी विद्यार्थ्यांना आपल्या शिक्षणाचा मार्ग बदलावा लागला. सबंध महाराष्ट्रात महाराष्ट्र निर्मितीपूर्वी शासकीय कला महाविद्यालये फक्त मुंबईसच होती. पण राज्यपुनर्रचनेनंतर जुन्या मध्य प्रदेशातील नागपूर येथील एका शासकीय विद्यालयाची त्यांत भर पडली. परंतु महाराष्ट्र राज्य कला संचालनालयाची स्थापना झाल्यानन्तर सबंध महाराष्ट्र राज्यातील उच्चकला शिक्षण क्षेत्रात प्रगतिपर विचारांचे वारे सुरू झाले व त्या विचारांतूनच मराठवाडा विभागातील गरजा व उणीवा लक्षात घेऊन अजिठा, वेरूळच्या कलात्मक पार्श्वभूमीवर या निसर्ग सौंदर्याच्या परिसरात शासनाने औरंगाबाद येथे १९७१ साली महाराष्ट्राचे तेव्हाचे लोकप्रिय मुख्यमंत्री मा. वसंतराव नाईक यांच्या शुभहस्ते, तेव्हाचे शिक्षणमंत्री श्री. मधुकरराव चौधरी, या विभागातील इतर मंत्री मा. सर्वश्री. शंकरराव चव्हाण, कल्याणराव पाटील, रफीक झकेरिया यांच्या उपस्थितीत शासकीय कला महाविद्यालयाचे उद्घाटन केले. तेव्हापासून या महाविद्यालयाची प्रगतिपर वाटचाल सुरू आहे

ह्या महाविद्यालयाचा एक प्रयत्नशील उपक्रम असा आहे की, ह्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना कला शिक्षण देण्याव्यतिरिक्त ह्या संस्थेमार्फत समाजातदेखील कलाभिरुची निर्माण करून जनतेतील कलारसिकांना वाढवून कलारसस्वादाचा आनंद निर्माण करणे हा होय. या दृष्टिकोनातून ह्या संस्थेने जनतेशी संपर्क साधण्यासाठी दरवर्षी संस्थेतील विद्यार्थ्यांच्या व त्याचप्रमाणे प्राध्यापकांच्या कलाकृतींची वेगवेगळी प्रदर्शने आयोजित केलेली आहेत. कलेतील वेगवेगळ्या विषयांवर त्या त्या विषयातील तज्ज्ञांची प्रात्यक्षिके आयोजित केली आहेत. कलेतील वेगवेगळ्या शैलीप्रवाहावर व्याख्याने आयोजित केलीत. ह्या संस्थेने आपली मर्यादा फक्त आपल्या कुंपणापर्यंतच ठेवली नसून समाजापर्यंत पोहोचून समाज व संस्था यांतील नाते दृढ करण्याच्या प्रयत्नशील उद्योगात ही संस्था आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण गुणांचा विकास करीत असतानाच त्यांच्या गुणांना गुरुजनाप्रमाणेच जनताजनार्दनाकडूनही प्रोत्साहन व उत्तेजन कसे मिळेल याही प्रयत्नात ही संस्था आहे. कारण शेवटी रसिकाविना "कलेला दाद" कोण देणार? योग्य दाद न मिळाल्यास कलाकाराची कलासाधना अव्याहतपणे कशी चालू राहणार? ह्या संस्थेवर कलाकार निर्माण करण्याची जबाबदारी जशी पडली आहे तशीच काही प्रमाणात कलारसिक निर्माण करण्याची, त्याचप्रमाणे कलारसिकांतील कलारसिकतेची वाढ करण्याचीही जबाबदारी तिला घ्यावी लागत आहे. ह्या जाणीवेतूनच ही संस्था जनतेशी एकरूप होण्याच्या प्रयत्नात असून त्यासाठीच ही कला प्रदर्शने, प्रात्यक्षिके व व्याख्याने वेळोवेळी सादर केली जात आहेत.


लेखक :

**गो. कृ. देशपांडे**

प्राचार्य, शासकीय कला महाविद्यालय, औरंगाबाद


ह्याच उपक्रमात यंदा या संस्थेतील प्राध्यापकांच्या कलाकृतींचे एक प्रदर्शन दिनांक २२, २३, २४ फेब्रुवारी रोजी संस्थेच्या आवारात आयोजित केले आहे. त्यात एकूण १५ प्राध्यापकांच्या प्रत्येकाच्या आपापल्या शैलीतील निवडक कलाकृती ठेवण्यात येत असून या प्रदर्शनाद्वारे निरनिराळ्या कलाकारांचे विचार व त्यांचे कलात्मक प्रकटीकरण दृष्टोत्पत्तीस पडेल व त्यातून एक वेगळीच अनुभूती औरंगाबादकरांना मिळेल अशी आशा वाटते. तरी ह्या दिशेने सुरू केलेल्या प्रवासात जनताजनार्दनाने सहभागी होऊन ह्या कलायात्रेचा लाभ घ्यावा.

## कलेला लोकाश्रय हवा

पूर्वी कलाकारांना राजाश्रय असे. कलावंतांचे गुण ओळखून त्याला त्याच्या कलासाधनेत व कलानिर्मितीत कुठल्याही प्रकारची अडचण भासणार नाही ह्याची योग्य ती काळजी घेतली जात होती. त्याच्यातील कलागुणांची वाढ व जोपासना होत होती. राज्ये गेली, राजे गेले, राजाश्रय गेला, आता लोकराज्याचे दिवस. तेव्हा कलावंताच्या गुणांचे परिपोषण लोकाश्रयातूनच व्हावयास हवे व काही प्रमाणात तसे घडत आहे. कला व उद्योग यांचे संबंध दृढ होत आहेत व विविध औद्योगिक संस्थांमार्फत कलावंतांच्या गुणांचे योग्य ते चीज होत आहे.

औद्योगिक समूहांना व्यावसायिक कलेचे महत्त्व पूर्णपणे पटले असून त्याचा ते जास्तीत जास्त लाभ घेत आहेत. असाच लाभ मराठवाड्याच्या विकासात भर घालणाऱ्या उद्योगपतींनी घ्यावयास हवा. त्यांनीही ह्या प्रदर्शनास भेट देऊन लाभ घ्यावा.

शेवटी कलाकार हादेखील एक सामान्य नागरिक असून तो आपल्यातलाच एक आहे ह्या भावनेतूनच जनतेने आपल्याकडे पाहावे असे त्याला वाटते व ह्याच भावनेतून तो आपली चित्रे प्रदर्शित करून जनतेशी एकरूप होऊ पाहात असतो. प्रेक्षकाला आपल्या चित्रातून आनंद मिळाला याच समाधानातून तोही एक वेगळाच आनंद लुटत असतो. तरी अशा प्रदर्शनांना भेट देऊन कलाकाराची दृकभाषा समजावून घेण्याचा प्रयत्न आवश्य करावा. शक्यता आहे प्रथम ही भाषा समजणे एखाद्याला जड जाईल. पण एकदा समजल्यावर ती समजल्याचा व समजल्यामुळे मिळणाऱ्या अनुभूतीचा एक वेगळाच आनंद प्रेक्षकाला लाभेल हे निश्चित. याच समाधानासाठी ही कलाप्रदर्शने.